**महाराष्ट्र शासन**
**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 **ई मेल -** mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2536/2023-24 दिनांक :-22/11/2023

## महाज्योतीमार्फत विविध प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या निवडीबाबत परिपत्रक

महाज्योती विद्यार्थी निवडीच्या प्रक्रियेबाबत सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, अनेक विद्यार्थ्यांकडून महाज्योतीच्या प्रशिक्षण योजनेचा दुबार लाभ देण्यात येऊ नये अशी विनंती केली जाते. या अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांकरिता खालील प्रमाणे बाबी स्पष्ट करण्यात येत आहे. खालील बाबीस अनुसरून महाज्योतीमध्ये प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांची निवड करण्यात येत आहे.

१. महाज्योतीने संबंधित विद्यार्थ्याला यापूर्वी कोणतेही प्रशिक्षण दिले आहे काय याची पडताळणी करण्यात येईल. संबधीत विद्यार्थ्याने महाज्योती कडून जर कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला असेल, तर असा विद्यार्थी दुबार लाभार्थी समजून त्याला पात्र विद्यार्थ्यांच्या यादीमधून वगळण्यात येईल.
२. सारथी तसेच SIAC या संस्था द्वारे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ जर एखादा विद्यार्थ्याने घेतला असेल, तर अश्या विद्यार्थ्याला दुबार लाभार्थी समजून प्रशिक्षण कार्यक्रमामधून त्या विद्यार्थ्याचे नाव वगळण्यात येईल.
३. प्रशिक्षणा करिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी ही महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. अश्यावेळी जर विद्यार्थ्यांना आढळून आले की विशिष्ठ विद्यार्थ्याने यापूर्वी प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ हा महाज्योती, सारथी किंवा SIAC कडून घेतलेला आहे. अश्या वेळी विद्यार्थी आक्षेप घेऊन त्या विद्यार्थ्याचे नाव महाज्योतीच्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊ शकतील.

उपरोक्त प्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असल्यामुळे व दुबार प्रशिक्षण देण्याचे कटाक्षाने टाळले जाणार असल्यामुळे तसेच सारथी व SIAC यांचे कडून प्रशिक्षण न घेतल्याबाबत देखील खात्री केली जाणार असल्यामुळे दुबार विद्यार्थ्यांची निवड केली जाणार नाही. याबद्दल विद्यार्थ्यांनी मनामध्ये कोणतीही शंका बाळगू नये. असे महाज्योतीतर्फे सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थी जेव्हा संस्थेमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता रुजू होईल तेव्हा संबंधित विद्यार्थ्याला त्याने यापूर्वी महाज्योतीच्या, सारथीच्या किंवा SIAC च्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला नाही. तसेच संबधित विद्यार्थी हा कंपनीमध्ये किंवा शासनामध्ये नोकरी करत नाही, असे प्रतिज्ञापत्र देखील भरून द्यावे लागणार आहे. त्यामुळे दुबार प्रशिक्षणाचा लाभ दिला जाणार नाही, या तत्वाचे महाज्योतीद्वारे कटाक्षाने पालन केले जाणार आहे. याबाबत विद्यार्थ्याने मनात कोणतेही शंका बाळगू नये.

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर